ePaper

# इतिहासकारांनी केवळ मुघलांनाच महत्त्व दिलं-अमित शहा



| वर्ष - 6 | अंक - 68 | UDYAM-MH-26-0158827 |


महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- कोल्हापुरच्या पहिलवानाने 'हाप की डाव' टाकला अन्
- देवेंद्र फडणवीस यांचा करिष्मा यापुढे महाराष्ट्रभरात चालणार : आमदार लांडगे
- शरद पवार यांच्या फडणवीसांवरील स्तुतीसुमनांनंतर राजकीय चर्चांना उधाण

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 12 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




नितीन गडकरी म्हणाले, "अनिल फिरोजिया यांना मी एक अट घातली आहे. माझं वजन त्यांच्यापेक्षा अधिक होतं. माझं वजन १३५ किलोग्रॅम होतं. आता माझं वजन ९३ किलो आहे. त्यामुळे अनिल फिरोजिया जितके किलो वजन कमी करतील तितके हजार कोटी रुपये त्यांच्या मतदारसंघासाठी देईन. अनिल फिरोजिया यांना वजन कमी करण्यासाठी १ किलोग्रॅममागे १ हजार कोटी रुपये देईन."

- नितीन गडकरी, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री

आंदोलनाच्या आडून सुरू असलेल्या राजकीय खेळीला त्यांनी आपला विरोध दर्शवला आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी म्हटलं की, "ज्या कुणी या आंदोलनाचं आयोजन केलं होतं, त्यांना या गोष्टीची समज असायला हवी होती की, आंदोलनस्थळी किमान माईकची व्यवस्था असायला हवी. माईकची व्यवस्था का नव्हती? या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी दिली होती का? याची चौकशी व्हायला हवी," असंही जलील यावेळी म्हणाले.-

इम्तियाज जलील, एमआयएमचे नेते



## शॉर्ट न्यूज »

### मोसमी पाऊस मुंबई-पुण्यापर्यंत; संपूर्ण कोकणातही व्यापला

**| पुणे |** अनुकूल वातावरणामुळे दोन दिवसांपासून आगेकूच करीत असलेल्या मोसमी पावसाने द्रुतगती घेत शनिवारी (११ जून) थेट मुंबई, ठाणे, पुण्यासह कोकणात बहुतांश भागात आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मजल मारली. पुढील ४८ तासांत त्याची आणखी प्रगती होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मोसमी पाऊस दाखल झाल्याने कोकण आणि मुंबई परिसरात पावसाने हजेरी लावली आहे. पुढील दोन दिवस कोकणात मुसळधार पावसाची शक्यता असून, उर्वरित सर्व महाराष्ट्रात पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

अरबी समुद्राच्या बाजूने मोसमी पावसाच्या प्रवासाला गुरुवारपासून (९ जून) चालना मिळाली. पोषक वातावरण तयार झाल्याने १० जूनला त्याने गोवा ओलांडून दक्षिण कोकणातून महाराष्ट्रात प्रवेश केला होता.

### संतपीठाच्याच्या माध्यमातून पदवीपर्यंत शिक्षण उपलब्ध

# संतपीठातून संस्कारीत विद्यार्थी घडतील !

### प्रथम पुस्तिका अक्षर संस्कारचे मान्यवरांचा हस्ते प्रकाशन

**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

टाळगाव चिखली येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्याच्या माध्यमातून केवळ शिक्षण नव्हे; तर संस्कारित विद्यार्थी घडवायचे आहेत. सध्या येथे पाचवीपर्यंत शिक्षण उपलब्ध असेल तरी पदवीपर्यंत शिक्षण आम्ही देणारच आहोत. एवढ्यावरच न थांबता अगदी पीएचडी आणि त्यापुढीलही शिक्षण देण्याचे संचालक मंडळाचे ध्येय आहे. शिक्षण घेण्यासाठी भविष्यात देशातीलच नव्हे तर जगातील विद्यार्थी येतील, असा विश्वास साहित्य व संस्कृती मंडळ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष तथा संतपीठचे संचालक डॉ. सदानंद महाराज मोरे यांनी व्यक्त केला. पिंपरी – चिंचवड महापालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, टाळगाव



चिखली आयोजित प्रथम पुस्तिका अक्षर संस्कार याचे प्रकाशन शनिवारी भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहात झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. मोरे बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पिंपरी – चिंचवड महापालिका आयुक्त तथा संतपीठचे अध्यक्ष राजेश पाटील यांनी केले. जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ शाळा अँड ज्युनियर कॉलेजचे संचालक तथा उपायुक्त संदीप खोत, उपायुक्त चंद्रकांत इंदलकर, दिनकरशास्त्री भुकेले, संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक राजू महाराज ढोरे, अभय टिळक यांसह अभ्यासक समिती, सांस्कृतिक समिती आणि सल्लागार समिती, चिंतन समितीचे सदस्य, संतपीठ शाळेचे पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते . हे पुस्तक तयार करण्यासाठी व प्रकाशनासाठी सर्व समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. डॉ. सदानंद मोरे यांनी पुस्तकाच्या माध्यमातून संतसाहित्याची परंपरा आणि मुल्ये यांचा वारसा आपण विद्यार्थांकडे सुपूर्त करीत आहोत असे आपल्या भाषणात नमुद केले. प्राचार्या डॉ. मृदुला महाजन यांनी संतपीठ शाळेच्या अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली.

> जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्याच्या माध्यमातून केवळ शिक्षण नव्हे; तर संस्कारित विद्यार्थी घडवायचे आहेत. सध्या येथे पाचवीपर्यंत शिक्षण उपलब्ध असेल तरी पदवीपर्यंत शिक्षण आम्ही देणारच आहोत. एवढ्यावरच न थांबता अगदी पीएचडी आणि त्यापुढीलही शिक्षण देण्याचे संचालक मंडळाचे ध्येय आहे. शिक्षण घेण्यासाठी भविष्यात देशातीलच नव्हे तर जगातील विद्यार्थी येतील, असा विश्वास साहित्य व संस्कृती मंडळ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष तथा संतपीठचे संचालक डॉ. सदानंद महाराज मोरे यांनी व्यक्त केला.

# देहविक्रीला 'प्रोफेशन' म्हणून मान्यता द्या ; अमृता फडणवीसांची पुण्यात मागणी

**| पुणे | महाईन्यूज |**

माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी यांनी भारतात देखील देहविक्री व्यवसायाला 'प्रोफेशन' म्हणून मान्यता देण्याची सरकारकडे मागणी केली. तसेच इतर व्यवसायांप्रमाणे देहविक्री व्यवसायाला सन्मान मिळाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्या पुण्यात शनिवारी (११ जून) दुपारी १ वाजता बुधवार पेठेतील महिलांसाठी मोफत आरोग्य शिबीर व मुलींसाठी सुकन्या कार्डचे वाटप कार्यक्रमात आल्या होत्या. यावेळी देहविक्री व्यवसायातील महिलांसमोर त्या बोलत होत्या.

अमृता फडणवीस म्हणाल्या, "मी



सरकारला असंच सांगेन की जसा इतर व्यवसायांना सन्मान असतो, त्याप्रमाणे देहविक्री व्यवसायाला देखील आदर मिळाला पाहिजे. त्याला एक व्यवसाय म्हणून स्विकारलं पाहिजे. जर्मनीसारख्या देशांमध्ये देहविक्री व्यवसाय करणाऱ्यांचं आदरणीय स्थान आहे. देहविक्री व्यवसाय करणारे या देशांमध्ये कर देखील भरतात. तेच स्थान आपण सर्वजण एकत्र आलो तर भारतात देखील मिळू शकतं. मी या निर्णयाच्या पाठीशी आहे."

### "देहविक्री व्यवसायातील महिलांनी दैनंदिन वैद्यकीय तपासणी करावी"

"तुम्ही तुमच्या आरोग्याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. त्यामुळे कितीही घाई असेल तर देहविक्री व्यवसायातील महिलांनी आपली वैद्यकीय तपासणी करावी. तुम्ही ज्या व्यवसायात आहात त्यात काही आजार होण्याचा धोका असतो, तो धोका ओळखा. तसेच नियमितपणे आपली तपासणी करून घ्या. त्यासाठी तुमच्यामागे भारतीय जनता पक्ष उभा आहे," असं अमृता फडणवीस यांनी सांगितलं.

## शॉर्ट न्यूज »

### ज्येष्ठ नागरिकाला सायबर चोरट्यांकडून पावणेदहा लाखांचा गंडा

पुणे । महाईन्यूज ।

महावितरणमध्ये अधिकारी असल्याची बतावणी करून चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाला एक अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्यातून नऊ लाख ७९ हजार रुपये लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.याबाबत एका ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार मीरानगर परिसरात राहायला आहेत. दोन दिवसांपूर्वी चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइलवर वीज बिल भरण्याबाबतचा संदेश पाठविला. त्यानंतर महावितरणधील अधिकारी आयुष कुमार बोलत असून वीज बिल भरण्यासाठी एक अ‍ॅप डाऊनलोड करावे लागेल, अशी बतावणी चोरट्याने त्यांच्याकडे केली. हे अ‍ॅप डाऊनलोड केल्यानंतर ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती चोरट्यांकडे गेले.

‘ये तो एक झाकी है, पुणे महानगरपालिका बाकी है’ अशा घोषणाही चंद्रकांत पाटील यांनी दिल्या

# कोल्हापुरच्या पहिलवानाने ‘हाप की डाव’ टाकला !

## चंद्रकांत पाटलांचा संजय राऊतांना खोचक टोला

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी



कोल्हापुरच्या पहिलवानाने ‘हाप की डाव’ टाकला अन्...; राज्यसभा निवडणुकीकडे राज्यातील सर्व जनतेचं काल रात्रभर लक्ष लागून होतं. पण कोल्हापुरच्या पहिलवानाने ‘हाप की डाव’ (कुस्ती खेळातील डाव) टाकला आणि संजय राऊत सहाव्या क्रमाकांवर फेकले गेले. आता असाच हाप की डाव पुणे महानगरपालिकेत टाकायचा आहे, असा टोला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार चंद्रकांत पाटील यांनी संजय राऊतांना लगावला आहे.

तर महापालिका निवडणुकीत यांनी १०० नगरसेवक कधी क्रॉस केले, हे कोणाच्याच लक्षात येणार नाही. त्यामुळे सर्वांनी तयारीला लागा. सप्टेंबर अखेरीस निवडणूक होऊ शकते, असे संकेत देखील चंद्रकांत पाटलांनी कार्यकर्त्यांना दिले. ‘ये तो एक झाकी है, पुणे महानगरपालिका बाकी है’ अशा घोषणाही चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

राज्यसभेच्या सहा जगांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाचे ३, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे प्रत्येकी एक उमेदवार निवडून आले. त्यामध्ये कोल्हापूर येथील शिवसेनेकडून संजय पवार आणि भाजपाकडून धनंजय महाडिक यांना उमेदवारी देण्यात आली होती. या दोघांच्या निवडणुकीकडे सर्वांचं पक्ष लागलं होतं. यामध्ये धनंजय महाडिक यांचा विजय झाला. या विजयानंतर राज्यभरात भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोष करण्यात येत आहे.

कोथरूड विधानसभा मतदार संघाचे आमदार आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचं पुण्यात आगमन होताच कार्यकर्त्यांनी त्यांचं जल्लोषात स्वागत केलं. यावेळी कोथरूड तेथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी कार्यकर्त्यांसोबत एका गाण्यावर ठेका देखील धरला.

राज्यसभेच्या सहा जगांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाचे ३, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे प्रत्येकी एक उमेदवार निवडून आले. त्यामध्ये कोल्हापूर येथील शिवसेनेकडून संजय पवार आणि भाजपाकडून धनंजय महाडिक यांना उमेदवारी देण्यात आली होती. या दोघांच्या निवडणुकीकडे सर्वांचं पक्ष लागलं होतं. यामध्ये धनंजय महाडिक यांचा विजय झाला. या विजयानंतर राज्यभरात भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोष करण्यात येत आहे.

महापालिका निवडणुकीत यांनी १०० नगरसेवक कधी क्रॉस केले, हे कोणाच्याच लक्षात येणार नाही. त्यामुळे सर्वांनी तयारीला लागा. सप्टेंबर अखेरीस निवडणूक होऊ शकते, असे संकेत देखील चंद्रकांत पाटलांनी कार्यकर्त्यांना दिले. ‘ये तो एक झाकी है, पुणे महानगरपालिका बाकी है’ अशा घोषणाही चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

# पुण्यात सीएनजी ८२ रुपये किलो, दोन महिन्यांत २० रुपयांची दरवाढ

## रिक्षा भाडं वाढवण्याची मागणी

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी




पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ काही दिवसांपासून थांबली असली, तरी सीएनजीच्या दरातील वाढ मात्र दोन महिन्यांपासून कायम आहे. पुणे शहरात सीएनजीच्या दरात पुन्हा दोन रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे शहरात सीएनजीचा दर ८२ रुपये किलो झाला आहे. गेल्या दोन महिन्यांत सीएनजी तब्बल २० रुपयांनी महागला आहे. सीएनजीची ही दरवाढ लक्षात घेता आता रिक्षाचे भाडे वाढवून मिळण्याची मागणी रिक्षा पंचायतीच्या वतीने शनिवारी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे करण्यात आली.

करातील कपातीपूर्वी पुण्यात पेट्रोल १२० रुपये, तर डिझेलचे दर १०२ रुपयांच्या पुढे होते. शासनाकडून करकपात झाल्यानंतर सध्या हे दर अनुक्रमे ११०.८७ रुपये आणि ९५.३६ रुपये लिटर आहेत. गेल्या काही दिवसांपासून हे दर स्थिर असले, तरी गेल्या दोन महिन्यांपासून सीएनजीची दरवाढ सुरू आहे. ३१ मार्चला ६८.५० रुपये असलेला सीएनजीचा दर राज्य शासनाने करात कपात केल्यानंतर ६२.२० रुपयांवर आला होता. मात्र, ५ एप्रिलला लगेचच त्यात वाढ होऊन तो ६८ रुपयांवर पोहोचला.

आठवड्यानंतर लगेचच दरात आणखी वाढ झाली असून, १३ एप्रिलपासून शहरात सीएनजी ७३ रुपये किलो झाला. त्यात २० एप्रिलला दोन रुपयांची वाढ होऊन दर ७५ रुपयांवर गेले. २९ एप्रिलला पुन्हा २.२० रुपयांची दरवाढ झाल्याने किलोमागे सीएनजीचा दर ७७.२० रुपयांवर पोहोचला होता. २२ दिवसांच्या कालावधीनंतर २१ मे रोजी त्यात २.८० रुपयांची वाढ झाली होती. त्यानंतर आता पुन्हा दोन रुपये वाढल्याने शहरात सीएनजीचा दर ८२ रुपये किलो झाला आहे.

शहरातील सर्व रिक्षा सध्या सीएनजी इंधनावर चालविल्या जातात. पीएमपीच्या अनेक बसही याच इंधनावर धावतात. पेट्रोलच्या तुलनेत सीएनजीचे दर कमी असल्याने अनेक खासगी मोटारीही गेल्या काही दिवसांत सीएनजीवर परावर्तित करण्यात आल्या आहेत. दोन महिन्यांपूर्वी ६२ रुपये किलोचा दर असणारा सीएनजी आता ८२ रुपयांवर पोहोचला असल्याने रिक्षा पंचायतीकडून भाडेवाढीची मागाणी करण्यात येत आहे.

### रिक्षा पंचायतीकडून रिक्षा दरवाढीची मागणी

रिक्षा पंचायत सरचिटणीस नितीन पवार म्हणाले, “सीएनजीची सातत्याने होत असलेली दरवाढ आणि अन्नधान्य, स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल- डिझेल या इंधनाच्या दरातही गेल्या काही दिवसांत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे राहणीमान निर्देशांकातही वाढ झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर रिक्षा पंचायतीने रिक्षा दरवाढीची मागणी केली आहे.

# पुणे : विश्रांतवाडीतील खाणीत सापडले दोन बेपत्ता तरुणांचे मृतदेह

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी




विश्रांतवाडी भागातून चार दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या दोन तरुणांचे मृतदेह परिसरातील खाणीत साठलेल्या पाण्यात शनिवारी (११ जून) सापडले. दोघेजण मित्र असून त्यापैकी एकजण सराईत गुन्हेगार आहे. विकी प्रकाश लंके (२०) आणि सुशांत सचिन बडदे (२१, दोघे रा. विश्रांतवाडी) अशी मृतावस्थेत सापडलेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात रात्री उशीरा अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली. लंके आणि बडदे दोघे मित्र असून विश्रांतवाडीतील भीमनगर भागात राहायला आहेत. लंके सराईत गुन्हेगार आहे. दोघे बुधवारी (८ जून) रात्री घरातून बेपत्ता झाले. त्यांच्या कुटुंबीयांकडून ते बेपत्ता झाल्यासंदर्भात पोलिसांकडे तक्रार देण्यात आली होती.

दरम्यान, शनिवारी दुपारी विश्रांतवाडी परिसरातील भीमनगर परिसरात असलेल्या खाणीतील पाण्यामध्ये मृतदेह तरंगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार विश्रांतवाडी पोलीस आणिअग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन शोधमोहिम राबविली. जवानांनी दोघांचे मृतदेह बाहेर काढले. ससून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत.

### खून झाल्याचा आरोप

बडदे आणि लंके दोघेजण चार दिवसांपूर्वी बेपत्ता झाले होते. त्यानंतर दोघांचे मृतदेह शनिवारी खाणीतील पाण्यात सापडले. दोघांचा खून झाल्याचा संशय नातेवाईकांकडून व्यक्त करण्यात आला आहे. दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रूग्णालयात पाठविण्यात आले असून शवविच्छेदनात मृत्यूमागचे कारण स्पष्ट होईल, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

### विधान परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विजयाची पुनरावृत्ती होणार

# देवेंद्र फडणवीस यांचा करिष्मा यापुढे महाराष्ट्रभरात चालणार

### आमदार महेश लांडगे यांनी राज्यसभा निवडणुकीतील भाजपाच्या विजयानंतर व्यक्त केला विश्वास

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



राज्यसभा निवडणुकीतील सहाव्या जागेसाठी विरोधकांनी मोठी मोर्चेबांधणी केली होती. मात्र, राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी अखेरच्या टप्प्यात निवडणूक जिंकली. फडणवीस यांचा हा करिष्मा यापुढील काळात महाराष्ट्रभर चालणार आहे, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ६ जागांसाठी शुक्रवारी निवडणूक झाली. अत्यंत प्रतिष्ठेच्या निवडणुकीत भाजपाने महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पराभूत केले. निवडणूक काळात मतदानाच्या दोन दिवस आधीच आमदार लांडगे मुंबईत दाखल झाले होते. आमदार लांडगे म्हणाले की, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी राज्यसभा निवडणुकीचे अचूक नियोजन केले. मतदानापूर्वीच फडणवीस चमत्कार करणार हे निश्चित होते. वास्तविक, संख्याबळ नसतानाही फडणवीस यांनी सहावी जागा लढवण्याची जोखीम पत्करली आणि ती यशस्वी करुन दाखवली. विधान सभेतील अन्य पक्षांतील आमदारांचाही फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास आहे, ही बाब आता अधोरेखित झाली आहे. राज्यसभेतील विजयाचा हा सिलसिला विधान परिषद आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निश्चितपणे दिसणार आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी अखेरच्या टप्प्यात निवडणूक जिंकली. फडणवीस यांचा हा करिष्मा यापुढील काळात महाराष्ट्रभर चालणार आहे, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, राज्यसभा सदस्य निवडणुकीत भाजपाच्या विजयानंतर पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी महिला प्रदेशाध्यक्षा उमा खापरे, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, माजी महापौर माई ढोरे, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, रवी अनासपुरे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, सदाशिव खाडे, राजेश पिल्ले, पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, प्रदेश सचिव अमित गोरखे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, राजू दुर्गे, महिला मोर्चा शहराध्यक्षा उज्ज्वला गावडे, युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र का नेता कैसा हो...देवेंद्र फडणवीस जैसा हो... यावेळी भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. आनंदोत्सवाच्या निमित्ताने मोठी गर्दी करीत शक्तिप्रदर्शन करण्यात आले. “महाराष्ट्र का नेता कैसा हो...देवेंद्र फडणवीस जैसा हो...”, देश का नेता कैसा हो... नरेंद्र मोदी जैसा हो...” अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. यावेळी एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त करण्यात आला.

### आमदार जगताप यांची पक्षनिष्ठा प्रेरणादायी...

पिंपरी-चिंचवडचे लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप आजारी असतानाही रुग्णवाहिकेतून तीन तासांचा प्रवास करीत मतदानासाठी विधान भवनात दाखल झाले. माझ्यासारख्या भाजपा कार्यकर्त्यासाठी ही प्रेरणादायी बाब आहे. त्याचबरोबर पुण्यातील कसबा मतदार संघाच्या आमदार मुक्ता टिळक यांनीही आजारपणात पक्षाशी असलेली बांधिलकी कृतीतून दाखवून दिली. “राष्ट्र प्रथम..”या ध्येयाने काम करणारे पक्षाचे सर्व आमदारांसाठी जगताप आणि टिळक यांनी आदर्श घालून दिला, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

# आर्थिक दुर्बल घटकातील कुटुंबांना दरमहा अर्थसहाय्य द्या !

### भाऊसाहेब पाटोळे : महाराष्ट्र मजूर पक्षाचे पिंपरीत भीक मागो आंदोलन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



केंद्र आणि राज्य सरकार रोजच इंधन दरवाढ करीत आहे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तू, पालेभाज्या, डाळी, तेल व इतर आवश्यक सेवा यांचे भाव वाढत आहेत. सर्वसामान्य नागरिकांना जगणे मुश्किल झाले आहे. आर्थिक दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील कुटुंबीयांची क्रयशक्ती संपुष्टात आली आहे. या वाढत्या महागाईचा सामना करणे दुर्बल घटकातील कुटुंबांना आता अशक्य होत आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आता केंद्र व राज्य सरकारने आर्थिक दुर्बल घटकातील प्रत्येक कुटुंबांना दरमहा पाच हजार रुपये अनुदान द्यावे. अन्यथा १ जुलै रोजी पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कचेरी समोर महाराष्ट्र मजूर पक्षाच्या वतीने लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र मजूर पक्षाचे राष्ट्रीय नेते भाऊसाहेब अडागळे यांनी पिंपरी येथे दिला.

गुरुवारी (दि. ९ जून) महाराष्ट्र मजूर पक्षाच्या वतीने पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात आणि वाढत्या महागाई विरोधात "भीक मागो आंदोलन" करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र मजूर पक्षाचे सचिव बाळासाहेब गवळी, पुणे जिल्हाध्यक्ष शिवाजी चव्हाण, वाहतूक आघाडीचे अध्यक्ष मयूर गायकवाड, प्रवक्ता प्रकाश कदम, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सविता आव्हाड, वाहतूक अध्यक्ष सुरेश मिसळ, महिला शहराध्यक्ष मनीषा प्रधान, हवेली तालुका अध्यक्ष मनीषा रणदिवे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष दत्ता तेलंग आदींसह महाराष्ट्र मजूर पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी भाऊसाहेब आडागळे म्हणाले की, पेट्रोल, डिझेल, सीएनजी, घरगुती वापराचा गॅस यांचे रोजच भाव वाढ होत आहे. त्यामुळे वाहतूक खर्च वाढत आहे आणि जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ होत आहे. याचा निषेध करण्यासाठी आणि सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भीक मागो आंदोलन केले आहे. याची सरकारने दखल घ्यावी आणि दुर्बल घटकातील कुटूंबियांना मासिक पाच हजार रुपये अर्थसहाय्य द्यावे.

# दारु पिण्यासाठी पैसे न दिल्यामुळे रिक्षाच्या काचेवर मारला बांबू

। भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याने एकाने ॲटो रिक्षाच्या काचेवर बांबूने मारुन नुकसान केले. ही घटना शुक्रवारी (दि.10) सकाळी साडेअकराच्या सुमारास पीएमटी बस स्टॉप भोसरी येथे घडली.

याप्रकरणी राहुल सुग्रीव कांबळे (वय 29, रा. मोशी) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अतुल अशोक भालेराव (वय 32, रा. डोळसवस्ती, अशोकनगर भोसरी) याला पोलिसांनी अटक केली आहे.

आरोपी अतुल हा राहुल याच्याकडे आला. त्याने दारु पिण्यासाठी राहुलकडे पैसे मागितले. राहुलने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपी अतुल याने राहुलच्या ॲटो रिक्षाच्या काचेवर बांबूने मारुन नुकसान केले.

फिर्यादी राहुल हा रिक्षाचालक आहे. शुक्रवारी आरोपी अतुल हा राहुल याच्याकडे आला. त्याने दारु पिण्यासाठी राहुलकडे पैसे मागितले. राहुलने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपी अतुल याने राहुलच्या ॲटो रिक्षाच्या काचेवर बांबूने मारुन नुकसान केले. राहुलच्या खिशातून 200 रुपये जबरदस्तीने काढून घेतले. भोसरी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## संपादकीय »

# राजकीय खेळी अन् खेळखंडोबा...!

***मुळात राज्यसभेच्या एका जागेकरिता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अथवा विधानसभेचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःची प्रतिष्ठा एवढ्या टोकाला नेऊन पणास लावण्याची काहीच गरज नव्हती. मात्र दुर्दैवाने राज्यसभेची सहाव्या जागेची लढाई हे राज्यातील आघाडी सरकार विरुद्ध भाजप अशी न राहता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे विरुद्ध विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस अशी व्यक्तिगत पातळीवर गेल्याचे चित्र या निवडणुकीतील राजकीय खेळीमधून दिसते.***

राजकारणात नेहमीच सत्तास्पर्धा ही राजकीय पक्षांमध्ये रंगलेली असते, मात्र महाराष्ट्रातील गेल्या काही महिन्यांतील राजकीय चित्र जर लक्षात घेतले तर महाराष्ट्रातील शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे महाविकास आघाडी सरकार अस्थिर कसे राहील याचाच पुरेपूर प्रयत्न राज्यात विरोधी पक्ष असलेल्या आणि केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपकडून राजकीय रणनीतीचा भाग म्हणून सातत्याने केला जात आहे. राज्यसभेच्या महाराष्ट्रातील सहा जागांसाठी शुक्रवारी मतदान होते. एकूण राजकीय रंग लक्षात घेता राज्यातील ठाकरे सरकारने सहावी जागा स्वतःच्या पदरात पाडून घेण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या आणि राजकीय खेळी केल्याचे आजच्या काही घडामोडींवरून स्पष्ट झाले. त्याचबरोबर राज्यातील विरोधी पक्षानेदेखील सहाव्या जागेसाठी कंबर कसली आहे. ही सहावी जागा महाविकास आघाडी सरकारच्या पदरात कशी पडणार नाही, यासाठी भाजपचे आता तर थेट केंद्रीय पातळीवरून प्रयत्न केले जात आहेत. मात्र हे सर्व राजकीय चित्र लक्षात घेतले तर गेले दहा ते पंधरा दिवस महाराष्ट्रात राज्यसभेच्या सहाव्या जागे ईतका निकराचा आणि अटीतटीचा कोणताही प्रश्न शिल्लकच राहिलेला नाही याची खात्री पटते.

वास्तविक राज्यसभेच्या निवडणुका या महाराष्ट्रात यापूर्वी बिनविरोध पार पडायच्या. याला अपवाद होता तो फक्त १९९८ च्या राज्यसभा निवडणुकीचा. १९९८ नंतर आता २०२२ म्हणजे जवळजवळ चोवीस वर्षांनी महाराष्ट्रातील राज्यसभेच्या निवडणुकांमध्ये रणधुमाळीने कळस गाठला आहे. राज्यसभा निवडणुकीचे हे रणकंदन दिल्लीत चाललेले असले तरी त्याचे केंद्र हे महाराष्ट्रात आहे. कारण गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्रात जे घडत आहेत, त्याचेच पडसाद सध्या राज्यसभा निवडणुकीच्या निमित्ताने दिल्लीत उमटत आहेत. गेले दीड वर्ष सर्वप्रकारे प्रयत्न करूनही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार पडत नाही.



## आनंदी सकाळ

# 'सर्व दुःखाचे कारण

दुःखावर आपण वरवर उपाय करतो, परंतु आपल्या दुःखाच्या मुळाशी आपले मनच आहे हे नाही आपल्या ध्यानात येत. खरोखर, सुख-दुःख हे वस्तूत नसून आपल्या मनःस्थितीवरच अवलंबून आहे. वस्तू चोरीला गेली त्या वेळी झोपेत, आनंदात होता, पण जागे झाल्यावर, वस्तू गेल्याचे समजल्यावर दुःखी झाला. म्हणजे दुःखी होते ते मन. तेव्हा, औषध द्यायचे ते मनाला द्या. संतांनी मनाला शिकवण दिली. आजवर आम्ही विषयसुख सख्ख्या मुलाप्रमाणे भोगले आणि परमार्थ सावत्र मुलासारखा केला. सावत्र आईप्रमाणे आम्ही मनाला शिकविले. ज्याचा सहवास झाला, त्याप्रमाणे मनावर परिणाम होऊ लागले. विषयाचा सहवास गर्भापासून आपण ठेवतो, म्हणून विषयापासून मिळणारा आनंद खरा मानू लागलो. ज्याचे बीज लावावे त्याची फळे खावी. आपण विषयाचे बी पेरतो, आणि विषयाची फळे दुःखदायक आहेत म्हणून मग शोक करतो, याला काय करावे? व्यापारी दरवर्षी आढावा घेतात त्याप्रमाणे, माझे विषय किती कमी झाले हे आपण पहावे. जितकी प्रपंचाकरिता तळमळ करतो, तितकी भगवंताकरिता करावी. प्रपंचातल्या अनुकूल परिस्थितीपेक्षा प्रतिकूल परिस्थिती हीच परमार्थाला जास्त उपकारक आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी ठरवतील, तो उमेदवारच राष्ट्रपती होण्याची शक्यता






मोदी सरकार आल्यानंतर दुसरी राष्ट्रपती निवडणूक होते आहे. सध्याचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा कार्यकाळ २४ जुलै रोजी संपत आहे. त्याआधी निवडणूक प्रक्रिया पुरी व्हावी लागेल. येत्या दोन-तीन दिवसांमध्ये अधिसूचना निघाली, की नव्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू होईल. गेल्या खेपेपेक्षा भारतीय जनता पक्षाचे लोकसभा; तसेच राज्यसभेत जास्त खासदार असले, तरी काही राज्यांची सत्ता भाजपच्या हातून गेली आहे. अर्थात, काही महिन्यांपूर्वी उत्तर प्रदेशासहित पाच राज्यांमध्ये निवडणूक झाली; तेव्हा चार राज्यांमध्ये भाजपला मिळालेले यश उपयुक्त ठरणार आहे. राष्ट्रपतींच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही केंद्रीय लोकप्रतिनिधीगृहांचे सभासद; तसेच देशातील केवळ विधानसभांचे सभासद मतदान करू शकतात. दिल्ली आणि पुदुच्चेरी हे केंद्रशासित प्रदेश असले, तरी त्यांच्या विधानसभा असल्याने तिथले आमदारही मतदान करतात. प्रत्येक राज्यातल्या निर्वाचित आमदाराच्या मताचे मूल्य त्या त्या राज्यातल्या लोकसंख्येनुसार बदलते. त्यामुळेच राष्ट्रपतींच्या निवडणुकीतील मतांचे एकूण मूल्य १० लाख ७९ हजार २०६ इतके आहे. या निवडणुकीतील मतमूल्य आणि मतमोजणी काहीशी गुंतागुंतीची आहे. त्यामुळेच, केंद्रात सरकार कुणाचे आहे, यावर नव्या राष्ट्रपतींची निवड ठरत नाही. कागदोपत्री हिशेब मांडला, तर सत्ताधारी 'एनडीए'कडे असणाऱ्या एकूण मतमूल्यापेक्षा इतर सर्व विरोधकांकडे असणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या मतांचे मूल्य आज अधिक आहे. यात काँग्रेससहित इतर राष्ट्रीय पक्ष; तसेच भाजपसोबत नसणारे सर्व प्रादेशिक पक्ष आले.

'एनडीए'पेक्षा इतर सर्वांचे एकत्रित मतमूल्य जास्त दिसत असले, तरी या सर्वांचा मिळून एकच विरोधी उमेदवार उभा राहतो का आणि त्याच्या मागे सर्व प्रादेशिक पक्ष उभे राहतात का, हा मोठाच प्रश्न आहे. तेलंगणचे मुख्यमंत्री केसीआर हे सतत भाजपविरोधी कडक भूमिका घेत असतात; मात्र त्यांच्या शेजारच्या आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी इतका भाजपविरोध बोलून दाखवत नाहीत. हीच गोष्ट ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांची. ओडिशातील लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये बिजू जनता दलाने भाजपला मागे टाकले, तरी नवीनबाबू केंद्राच्या विरोधात कायम हातात तलवार घेऊन उभे नसतात.

# कोरोनाच्या पार्श्वभूमिवर तिमीरातूनी तेजाकडे...

**निकालानंतर काही जण निराश होतात. त्यातून टोकाची पावलं उचलली जातात. आयुष्यात परीक्षेतील यशाला महत्व असतेच. परीक्षा भविष्यात येणाऱ्या आव्हानांची तयारी करून घेते. यानंतर सुरू होणाऱ्या शैक्षणिक वाटचालीसाठी आणि आपल्या आवडत्या क्षेत्रामध्ये भविष्य घडवण्यासाठी हार्दिक शुभेच्छा. या वाटचालीतून तुम्हाला आपल्या कुटुंबियांसह, समाज आणि देशाचे भविष्य उज्ज्वल करण्याची संधी मिळणार आहे, या संधीचे आपण सोने कराल, हा विश्वास आहे.**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेच्या निकालात यंदाही मुलींनी बाजी मारली. मार्च आणि एप्रिल महिन्यात लेखी स्वरुपात या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. हा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे गेल्या वर्षी कोरोनामुळे महाविद्यालय स्तरावरच हा निर्णय निकाल तयार केल्यामुळे जवळपास सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यंदा मात्र लेखी परीक्षेच्या आधारे गुणांकन झाले तरी, मुलांपेक्षा मुलीच अधिक सरस असल्याचे निकालाच्या आकडेवारीतून स्पष्ट होते. राज्याच्या एकूण निकाल ९४.२२ टक्के लागला. त्यात मुलींचे प्रमाण ९५.३५ टक्के इतके आणि मुलांचे प्रमाण ९३.२९ टक्के इतके आहे.



सरासरी दोन टक्के मुली मुलांपेक्षा दोन पाऊलं पुढे आहेत. प्रत्येक क्षेत्रात मुली पुढे असल्याचे दिसून येते. नुकत्याच जाहीर झालेल्या यूपीएससीच्या निकालात मुलीच अव्वल होत्या. एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षा असो किंवा महाविद्यालयीन परीक्षा यात मुलींचीच सरशी होत असल्याने प्रत्येक क्षेत्रात मुलींचा दबदबा वाढत आहे.

गेल्या बारा वर्षांपासून मुलींनी बोर्डाच्या परीक्षेत बाजी मारल्याचे आपल्याला दिसून येईल. मुलींच्या यशामागील रहस्य शोधले असता मुलांपेक्षा मुली अभ्यास आणि करिअरविषयी जास्त गांभीर्याने विचार करत असल्याचे बोर्डाच्या निकालातून स्पष्ट झाले आहे. करिअरची दिशा निश्चित करण्यासाठी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या निकालास विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व असते. त्यामुळे या परीक्षांच्या निकालाकडे केवळ विद्यार्थीच नव्हे तर पालकांचेही विशेष लक्ष लागून असते. बारावी परीक्षेचा निकाल बुधवारी जाहीर झाला आणि त्यातही अपेक्षेप्रमाणे मुलींनीच बाजी मारली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥
आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### म्हणून अनाजी पंतांना महाराष्ट्र स्वीकारणार नाही

।मुंबई ।महाईन्यूज ।

राज्यसभा निवडणुकीचा निकाल नुकत्याच काही तासांपूर्वी जाहीर झाला आहे. एकीकडे महाविकास आघाडीमध्ये नाराजीचे वातावरण पसरलेले आहे, तर दुसरीकडे भारतीय जनता पक्षाचे नेते मोठ्या जल्लोषात आनंद साजरा करत आहेत. दरम्यान शिवसेना नेत्या दिपाली सय्यद यांनी त्यांच्या ट्विटर अकाउंटवर एक पोस्ट शेअर करत



देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला आहे. या ट्विटद्वारे दिपाली सय्यद यांनी देवेंद्र फडणवीसांवर खोचक टिका केलेली आहे.

या ट्विटमध्ये दिपाली सय्यद म्हणाल्या की, “एका राज्यसभेने मुख्यमंत्री बनता येत नाही, एका राज्यसभेने मुंबईचे महापौर बनता येत नाही, एका राज्यसभेने कोल्हापूर पोटनिवडणुक जिंकता येत नाही. १०६ काय १३० असुद्या पण अनाजी पंतांना महाराष्ट्र स्विकारणार नाही. काही केले तरी पुन्हा येता येणार नाही. जगातील मोठा पक्ष एका राज्यसभेवर होत नाही”. असं ट्विट दिपाली यांनी केलं आहे.

# शरद पवार यांची फडणवीसांवर स्तुतीसुमने!

## राजकीय वर्तुळात लढवले जात आहेत तर्क वितर्क

।मुंबई ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

महाराष्ट्रात राज्यसभेच्या ६ जागांपैकी ३ जागांवर भाजपला विजय मिळाला आहे. या विजयानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी या निकालावर आपल्याला जराही आश्चर्य वाटलं नसल्याचे म्हटले आहे. तर पवार यांच्या कन्या आणि राष्ट्रवादीच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनीदेखील भाजपला शुभेच्छा दिल्या. तसेच आपल्याला हा पराभव स्वीकारायला हवा असे म्हटले आहे. यामुळे पवार पिता पुत्रीच्या मनात नेमके काय सुरू आहे यावर आता राजकीय वर्तुळात तर्क वितर्क लढवले जात आहेत.

शुक्रवारी पार पडलेल्या राज्यसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार केंद्रीय मंत्री पियुष गोयल, राज्याचे माजी मंत्री अनिल बोंडे आणि माजी खासदार धनंजय महाडिक विजयी झाले आहेत. तर शिवसेनेचे नेते संजय राऊत , राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल आणि काँग्रेसचे इमरान प्रतापगढी हे देखील राज्यसभेच्या निवडणुकीत जिंकले आहेत. मात्र



> महाराष्ट्राच्या राजकारणात पवार हे ज्येष्ठ अनुभवी खेळाडू असून त्यांना चाणक्यही म्हटले जाते. यामुळे भाजपच्या खेळीची त्यांना आधीच कल्पना होती का आणि जर त्यांना हे माहित होते तर मग त्यांनी सरकारमधील इतर दोन पक्षांना आधीच सावध का केले नाही असा सवाल आता मविआचे नेते करत आहेत. दरम्यान, ऐन निवडणुकीच्या धामधुमीत देवेंद्र फडणवीस यांना कोरोनाची लागण झाली होती. ते घरातच क्वारनटाईन झाले. पण त्यानंतरही फडणवीस भाजपच्या नेतेमंडळींबरोबर व्हिडीओ कॉनफरन्सिंगद्वारे संपर्कात होते. याचाच फायदा राज्यसभेत भाजपला झाला आहे.

शिवसेनेचे दुसरे उमेदवार संजय पवार यांना भाजपचे धनंजय महाडिक यांनी पराभूत केले आहे. अत्यंत अटीतटी आणि चुरशीच्या झालेल्या या निवडणूकीत अनेक नाट्यमय घटनाही घडल्या. यावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये आरोप -प्रत्यारोपाच्या फैरीही झडल्या. निवडणुक आयोगाने मतमोजणी रोखली यामुळे निकालही विलंबाने लागला. यामुळे मविआ आणि भाजपमध्ये द्वंदयुद्ध झाले. अखेर ६ पैकी ३ जागांवर विजय मिळवत भाजपने मविआला जोर का धक्का दिला. यावरून संजय राऊतांसह मविआतील अनेक नेत्यांनी नाराजी व्यक्त करत भाजपला लक्ष्य केलं.

पण हे सगळे बघून पवार यांनी आपल्याला जराही आश्चर्य झालं

> अत्यंत अटीतटी आणि चुरशीच्या झालेल्या या निवडणूकीत अनेक नाट्यमय घटनाही घडल्या. यावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये आरोप -प्रत्यारोपाच्या फैरीही झडल्या. निवडणुक आयोगाने मतमोजणी रोखली यामुळे निकालही विलंबाने लागला. यामुळे मविआ आणि भाजपमध्ये द्वंदयुद्ध झाले.

नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी देवेंद्र फडणवीस यांचे गुणगाणच केले. अपक्ष उमेदवारांचे मत मिळवण्यात भाजपला यश मिळाले असेही ते म्हणाले. तर शिवसेनेचे संजय राऊत यांनी मात्र आगपाखड करत निवडणूक आयोग आणि भाजप यांच्यात साटेलोटे असल्याचाचं आरोप केला. काँग्रेसचे नाना पटोले यांनीही यावर आक्रमक भूमिका घेत आम्ही फडणवीस यांच्या गेम प्लानमध्ये फसल्याचं सांगत थेट भाजपवर निशाणा साधला.

तर राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपला शुभेच्छा दिल्या. तसेच हा पराभव स्विकारायला हवा असेही सांगितले. यामुळे महाविकास आघाडी सरकारमधील शिवसेना आणि काँग्रेस नेत्यांच्या जिव्हारी जेवढा हा पराभव लागला तेवढा तो पवार आणि सुप्रियांना का लागला नाही. त्यांनी तो इतक्या सहजपणे कसा स्विकारला यावर आता मविआ सरकारमधील नेते मंडळींची खलबंत सुरू झाली आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पवार हे ज्येष्ठ अनुभवी खेळाडू असून त्यांना चाणक्यही म्हटले जाते. यामुळे भाजपच्या खेळीची त्यांना आधीच कल्पना होती का आणि जर त्यांना हे माहित होते तर मग त्यांनी सरकारमधील इतर दोन पक्षांना आधीच सावध का केले नाही असा सवाल आता मविआचे नेते करत आहेत.दरम्यान, ऐन निवडणुकीच्या धामधुमीत देवेंद्र फडणवीस यांना कोरोनाची लागण झाली होती. ते घरातच क्वारनटाईन झाले. पण त्यानंतरही फडणवीस भाजपच्या नेतेमंडळींबरोबर व्हिडीओ कॉनफरन्सिंगद्वारे संपर्कात होते. याचाच फायदा राज्यसभेत भाजपला झाला आहे.

# मुलायमसिंहांचे समर्थन घेताना भाजपच्या ह्रदयातील राम कुठे गेला?

## सचिन सावंतांचा आशिष शेलारांवर पलटवार

।मुंबई ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये एमआयएमने काँग्रेसला पाठिंबा दिला. राज्यसभा निवडणूक मतदानाच्या दिवशीच एमआयएम खासदार इम्तियाज जलील यांनी आपण महाविकास आघाडीला पाठिंबा देत असून काँग्रेसच्या उमेदवाराला मतदान करणार असल्याचे जाहीर केले. राज्यसभेत काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले. परंतु एमआयएमच्या पाठिंबा दिल्यामुळे भाजप आमदार आशिष शेलार यांनी महाविकास आघाडीवर टीका केले. एमआयएमचे मत घेताना ह्रदयातील राम कुठे काढून ठेवला? असा सवाल शेलारांनी केला होता. यावर काँग्रेसचे वरिष्ठ नेते सचिन सावंत यांनी पलटवार करताना मुलायमसिंह यांच्या समर्थनावरुन निशाणा साधला आहे.



काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी भाजप आमदार आशिष शेलारांच्या टीकेवर पलटवार केला आहे. राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये एमआयएमने पाठिंबा दिल्यामुळे शेलारांनी महाविकास आघाडीवर टीका करताना ह्रदयातील राम काढला होता. यावर सचिन सावंतांनी राष्ट्रपाती पदाच्या निवडणुकीमध्ये भाजपला मुलायम सिंह यांनी दिलेल्या पाठिंब्यांची आठवण करुन दिली आहे. तसेच त्यावेळी भाजपच्या ह्रदयातील राम कुठे गेला? असा सवालसुद्धा शेलारांना केला आहे. आशिष शेलारांनी आपल्या स्मृतीभ्रंशावर उपचार केला पाहिजे असा टोला सचिन सावंत यांनी लगावला आहे.

# मुख्यमंत्र्यांचे राज्यसभा पराभवानंतर शिवसेनेच्या नेत्यांसोबत चिंतन

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला धोबीपछाड

।मुंबई ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

राज्यसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून दोन उमेदवार देण्यात आले होते. यापैकी, शिवसेना नेते संजय राऊत यांचा विजय झाला तर दुसरे उमेदवार कोल्हापूरचे जिल्हा प्रमूख संजय पवार यांचा पराभव झाला आहे. भाजपचा उमेदवार जिंकला असून विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला धोबीपछाड दिला आहे. दरम्यान महाविकास आघाडीतील १० अपक्ष आमदारांची मत फुटली आहेत. यावर आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे शिवसेनेच्या नेत्यांसोबत चिंतन सुरु आहे. अपक्ष आमदारांची मत



फुटण्यामागे कारण काय? यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वर्षा निवसस्थानी शिवसेना नेत्यांची बैठक बोलवले. या बैठकीमध्ये मुख्यमंत्री राज्यसभा निवडणुकीच्या पराभवावर चर्चा करण्याची शक्यता आहेत. तसेच अधिक संख्याबळ असताना शिवसेनेचा उमेदवार पराभूत कसा झाला? याची कारणे शोधण्याचे काम करण्यात येत आहे. या बैठकीला शिवसेना नेते एकनाथ शिंदे, अनिल परब, आणि संजय राऊत उपस्थित आहेत.

राज्यसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगलाच धक्का बसला आहे. परंतु हा पराभव शिवसेनेच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. शिवसेना खासदार संजय राऊत यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. तसेच अपक्ष आमदारांनी धोका दिला असल्याचे त्यांनी म्हटलं आहे.


मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बैठक बोलावली असून या बैठकीमध्ये पराभवावर चिंतन सुरु आहे. दरम्यान अपक्ष आमदारांची मत फुटली कशी? यमागील कारणांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

### संजय राऊत – शरद पवार भेट – राऊत

▶▶ राज्यसभा निवडणुकीचे निकाल आल्यानंतर शनिवारी दुपारी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. सिल्व्हर ओक या शरद पवारांच्या निवासस्थानी भेट झाली. राज्यसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर पवारांचे आशीर्वाद घेण्यासाठी गेलो होते असे संजय राऊत यांनी सांगितले. तसेच शिवसेनेच्या सहाव्या जागेवरील उमेदवाराच्या पराभवाबाबत चर्चा करण्यात आली. या निवडणुकीमध्ये कुठे दगाफटका झाला? पराभवामागील कारण काय? याबाबत चर्चा केली असून विधान परिषदेच्या निवडणुकीबाबतही चर्चा केली असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. यानंतर संजय राऊत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी गेले होते.

## शॉर्ट न्यूज »

### पंतप्रधानांच्या हस्ते तुकोबांच्या शिळामंदिर लोकार्पणासाठी देहूत जय्यत तयारी



। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

श्रीक्षेत्र देहूत जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या शिळामंदिराचे लोकार्पण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या १४ जूनला देहूत येणार आहेत. त्या निमित्ताने मंदिरात आणि देहू परिसरात जय्यत तयारी सुरू आहे. २० जूनला तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून त्यापूर्वी पंतप्रधान देहूत येणार असल्याने वारकरी संप्रदायात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

देहूतील मुख्य मंदिरामध्ये दगडात कोरीव काम करून साकारण्यात आलेल्या या शिळामंदिराची पायाभरणी प्रतिभाताई पाटील राष्ट्रपती असताना झाली होती. त्याचे लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते व्हावे, असा संस्थानचा आग्रह होता. त्यादृष्टीने २९ मार्च २०२२ रोजी पंतप्रधानांना निमंत्रण देण्यासाठी संस्थानचे विश्वस्त मंडळ दिल्लीत गेले होते.

# काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना ED चे पुन्हा समन्स

## 23 जूनला चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

नॅशनल हेराल्ड'शी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी सक्तवसुली संचालनालय (ED) ने काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी (Soniya Gandhi) यांना पुन्हा समन्स बजावले आहे. सोनिया गांधी यांना २३ जून रोजी चौकशीसाठी ईडीसोमोर हजर राहण्यास सांगितले आहे. या अगोदरही सोनिया गांधी यांना समन्स बजावण्यात आला होता. मात्र, करोनाची लागण झाल्यामुळे त्यांनी ईडीकडे वेळ मागितला होता.

कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी सोनिया गांधीसोबत राहुल गांधींनाही ईडीने समन्स बजावले होते. २ जूनला राहुल यांना चौकशीसाठी ईडीसमोर हजर राहण्यास सांगितले होते. परंतु राहुल गांधी देशाबाहेर असल्यामुळे त्यांनी आणखी काही दिवसांची मुदत मागितली होती.

काँग्रेसच्या मालकीचे 'नॅशनल



हेरॉल्ड' हे इंग्रजी वृत्तपत्र असोसिएटेड जर्नल लिमिटेड (एजेएल) कंपनीतर्फे चालवले जात होते. ही कंपनी ९० कोटींच्या कर्जात बुडाल्यानंतर 'यंग इंडियन प्रा लिमिटेड' ही नवी कंपनी स्थापन करण्यात आली. कर्जाचे रुपांतर समभागांमध्ये केले गेले आणि 'यंग इंडियन'कडून 'एजेएल'ला ९ कोटींचे समभाग दिले गेले. या आर्थिक व्यवहारातून मिळालेल्या पैशांचा वापर 'एजेएल'ने कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन, प्रॉव्हिडंट फंड देण्यासाठी केला. 'एजेएल'चे कर्ज फेडण्यासाठी काँग्रेसने 'यंग इंडियन'ला ९० कोटींचे कर्ज दिले, नंतर हे कर्जही माफ करण्यात आले. 'यंग इंडियन'मध्ये सोनिया व राहुल यांची ३८-३८ टक्के हिस्सेदारी आहे. काँग्रेसने दिलेल्या कर्जामागे 'एजेएल'

### सूडबुद्धीने कारवाई केल्याचा काँग्रेसचा आरोप

⏭ केंद्रातील भाजप सरकार सुडबुद्धीने कारवाई करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला यातून विरोधकांबद्दल असलेली भीती आणि भाजपचे गलिच्छ राजकारण दिसून येते मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, हिमाचल प्रदेश आदी काही राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार असल्याने केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधी नेत्यांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावला जात असल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

कंपनीची २ हजार कोटींची मालमत्ता गांधी कुटुंबाच्या ताब्यात देण्याचा हेतू होता, असा आरोप आहे त्यासाठी गांधी कुटुंबाने फक्त ५० लाख रुपये दिले. हा आर्थिक गैरव्यवहार असून करही बुडवला गेला आहे, अशी तक्रार २०१३ मध्ये भाजपचे खासदार सुब्रमण्यम यांनी न्यायालयात केली.



### प्रेषित मोहम्मद अवमान प्रकरण

# झारखंडमध्ये निदर्शनाला हिंसक वळण

## गोळीबारामध्ये दोघांचा मृत्यू; इंटरनेटसेवा बंद

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाजपच्या निलंबित प्रवक्त्या नूपुर शर्मा आणि नवीन जिंदल यांनी प्रेषित मोहम्मद यांच्यावर केलेल्या आक्षेपार्ह शेरेबाजीच्या निषेधार्थ राजधानी दिल्ली, उत्तर प्रदेश, गुजरातसह अनेक ठिकाणी निदर्शने करण्यात आली. काही ठिकाणी या निदर्शनांना हिंसक वळण लागले असून जीवित तसेच मोठी वित्तहानी झाली आहे. निदर्शने आणि हिंसाचाराचे हो लोण आता झारखंडपर्यंत पोहोचले आहे. येथे शुक्रवारी नुपूर शर्मा यांच्याविरोधात निदर्शने करण्यात आली. या निदर्शनाला हिंसक वळण लागल्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात येथे दोघांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी झाले आहेत.

याबाबतचे सविस्तर वृत्त आजतकने दिले आहे. या वृत्तानुसार झारखंडमधील रांची येथे शुक्रवारी संध्याकाळी नुपूर शर्मा यांना अटक करण्याच्या मागणीला घेऊन निदर्शने करण्यात आली. यावेळी रस्त्यावर हजारो लोक जमले होते. निदर्शकांना पांगवण्यासाठी येथील पोलिसांनी लाठीमार तसेच गोळीबार केला. त्यानंतर वातावरण चिघळल्यामुळे निदर्शनाला हिंसक वळण मिळाले. निदर्शकांनीदेखील पोलिसांवर दगडफेक केली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये दोघांचा मृत्यू झाला. मुद्दसीर उर्फ कैफी आणि मोहम्मद साहील अशी मृतांची नावे आहेत. तर आठ जणांवर सध्या उपचार सुरु आहे.

### भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शिवसेना आणि महाविकास आघाडीवर टीकास्त्र सोडलं

# फटके खाल्ल्याशिवाय त्यांना शहाणपण शिकता येत नाही !

## निवडणुकीतील विजयानंतर चंद्रकांत पाटलांची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पहाटे चारच्या सुमारास राज्यसभा निवडणुकीचा निकाल लागला आहे. यामध्ये महाविकास आघाडी आणि भारतीय जनता पार्टीचे प्रत्येकी तीन उमेदवार निवडून आले आहे. राज्यसभा निवडणुकीच्या या निकालानंतर आता राजकीय नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. निवडणुकीत विजय संपादन केल्यानंतर महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शिवसेना आणि महाविकास आघाडीवर टीकास्त्र सोडलं आहे.



माध्यमांशी बोलताना त्यांनी म्हटलं की, "भाजपा तिसरी जागा जिंकणारच होती. त्यामुळे अर्ज मागे घेण्याच्या दिवशी आम्ही त्यांच्याकडे आग्रह धरला की, हा हट्ट करू नका. गेल्या २४ वर्षात महाराष्ट्रात राज्यसभेच्या निवडणुका झाल्या नाहीत. आमच्याकडे भाजपाची ३० मते आहेत, त्यामुळे तुम्ही कशासाठी हट्ट धरता. विधान परिषदेला पाचवी जागा जिंकता येते तरीसुद्धा बिनविरोध होऊ, असंही आम्ही सांगितलं होतं. पण त्यांनी ऐकलं नाही."

> महाविकास आघाडी आणि भारतीय जनता पार्टीचे प्रत्येकी तीन उमेदवार निवडून आले आहे. राज्यसभा निवडणुकीच्या या निकालानंतर आता राजकीय नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. निवडणुकीत विजय संपादन केल्यानंतर महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शिवसेना आणि महाविकास आघाडीवर टीकास्त्र सोडलं आहे.

> देवेंद्र फडणवीस हे असं रसायन आहे की, त्यांच्या डोक्यात काय चाललंय हे माझ्यासारख्या सहकारी कार्यकर्त्याला देखील कळणं अवघड आहे. आमचा त्यांच्यावर खूप विश्वास आहे. ते जे सांगतील तेवढंच काम आम्ही करतो. संजय राऊतांपेक्षा आमच्या उमेदवाराला किमान अर्धा मत अधिक मिळेल, हे देवेंद्र फडणीवासांनी लक्ष्य ठेवलं होतं.

देवेंद्र फडणवीस हे असं रसायन आहे की, त्यांच्या डोक्यात काय चाललंय हे माझ्यासारख्या सहकारी कार्यकर्त्याला देखील कळणं अवघड आहे. आमचा त्यांच्यावर खूप विश्वास आहे. ते जे सांगतील तेवढंच काम आम्ही करतो. संजय राऊतांपेक्षा आमच्या उमेदवाराला किमान अर्धा मत अधिक मिळेल, हे देवेंद्र फडणीवासांनी लक्ष्य ठेवलं होतं. त्याप्रमाणे नियोजन करत त्यांनी सहावा उमेदवार विजयी केला. त्यानुसार धनंजय महाडिकांना संजय राऊतांपेक्षा अर्धा मत (४१.५६ मते) अधिक मिळाला आहे.

महाराष्ट्रातील आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, राज्यसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्यामुळे महाविकास आघाडी काही शहाणपण शिकेल का? असा प्रश्न विचारला असता, ते म्हणाले की, "त्यांना फटके खाल्ल्याशिवाय शहाणपण शिकता येत नसेल तर त्यांना तसेही फटके मिळतील. विधान परिषदेच्या निवडणुकीत आम्ही सहा जागा विजयी करणार. तुम्ही म्हणाल हा काय अतिआत्मविश्वास आहे. पण हा आत्मविश्वास आहे, हे एक गणित आहे. जिथे मतं दाखवून टाकावी लागतात, तिथे आम्हाला जर अकरा मतं जास्त मिळत असतील, तर विधान परिषदेत गुप्त पद्धतीने मतदान केलं जातं. त्यामुळे तेथे आम्ही सहा जागा विजयी करणार."

# ‘रूप नगर के चीते’ चित्रपटातून झळकणार मैत्रीची अनोखी गोष्ट

***येत्या 16 सप्टेंबरला 'रूप नगर के चीते' आपल्या भेटीला येतील, त्यापूर्वी या चित्रपटाचं एक धमाकेदार पोस्टर रिलीज करण्यात आलं आहे. चिखलात माखलेले, कशाचीही पर्वा न करता, आपल्याच मस्तीत असलेले दोन जिगरी दोस्त आपल्याला त्यात दिसताहेत***



कोणत्याही शब्दांच्या चौकटीत न मावणारं नातं म्हणजे ‘मैत्री’. रक्ताच्या नात्याच्या बंधापेक्षा मैत्रीच्या नात्याचे बंध अधिक घट्ट असतात.मैत्री ... ती तशी कोणाबरोबरही होते, अनेकदा आपल्याही नकळत. त्याला वय, भाषा, धर्म, वर्ण कशाचीही मर्यादा नसते. अशाच एका मैत्रीची अनोखी गोष्ट एका मराठी चित्रपटातून लवकरच आपल्या भेटीला येणार आहे. नाव आहे ...‘रूप नगर के चीते’! दचकू नका..! नाव जरी हिंदी असलं तरी चित्रपट मात्र मराठी आहे.

येत्या १६ सप्टेंबरला ‘रूप नगर के चीते’ आपल्या भेटीला येतील, त्यापूर्वी या चित्रपटाचं एक धमाकेदार पोस्टर रिलीज करण्यात आलं आहे. चिखलात माखलेले, कशाचीही पर्वा न करता, आपल्याच मस्तीत असलेले दोन जिगरी दोस्त आपल्याला त्यात दिसताहेत. ते कोण आहेत? त्याची ओळख लवकरच होणार आहे.एस एंटरटेनमेंट बॅनरखाली बॉलीवूड मधील संगीतकार मनन शाह यांनी ‘रूप नगर के चीते’ या मराठी चित्रपटाची निर्मिती केली असून अतिशय भव्य दिव्य पद्धतीने दिग्दर्शक विहान सूर्यवंशी यांनी हा चित्रपट साकारला आहे.

सध्याच्या जगात मैत्रीची व्याख्या जरी तीच असली तरी तीचं स्वरुप बदलताना दिसतंय. या चित्रपटातूनही मैत्रीमधला वेगळा विचार आपल्या समोर येणार आहे. दोन बालमित्रांचा रोमहर्षक प्रवास आणि एका घटनेनंतर त्यांचं दोन भिन्न शहरांतील विरोधाभासी जीवन दर्शवणारा आहे.

# पाकिस्तानच्या ‘या’ करिश्मा पुढे बॉलिवूड अभिनेत्रीसुद्धा आहेत फिक्या



***सध्या वारंवार सोशल मीडियावर अशाच एका तरूणीचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात जी अगदी हुबेहुब करिश्मा कपूर सारखी दिसतेय. या तरूणीला पाहून करिश्मा कपूरचे चाहते सुद्धा हैराण झाले आहेत.***

बॉलिवूडमध्ये असे अनेक कलाकार आहेत ज्यांच्यामुळे त्यांच्यासारखेच दिसणारे लोग प्रसिद्ध होतात. काही लोक असे आहेत, जे हुबेहुब चित्रपटातील कलाकारांसारखेच दिसतात. आता अलीकडे सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे अशा अनेक लोकांना चांगलीच प्रसिद्धी मिळत आहे. सध्या वारंवार सोशल मीडियावर अशाच एका तरूणीचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात जी अगदी हुबेहुब करिश्मा कपूर सारखी दिसतेय. या तरूणीला पाहून करिश्मा कपूरचे चाहते सुद्धा हैराण झाले आहेत.

करिश्मा कपूर सारखी हूबेहूब दिसणाऱ्या या तरूणीचे नाव हिना खान असून हि तरूणी पाकिस्तानची आहे. तसेच हि सोशल मीडियावर खूप ॲक्टिव असते. तिने शेअर केलेले फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर या तरूणीचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. तसेच हिनाचे अनेक व्हिडीओ करिश्मा कपूरच्या चित्रपटातील गाण्यांवर आणि डायलॉगवर असतात.

हिना खानत्या लूकबाबत सांगायला गेलं तर हिनाचे डोळे आणि केसांची रचना सुद्धा अगदी करिश्मा कपूर सारखीच आहे.याशिवाय तिचा चेहरा सुद्धा करिश्मा कपूर सारखाच आहे. तसेच हिनाचे तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनेक फॉलोवर्स आहेत.तर करिश्मा कपूरचेही सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत. करिश्मा कपूरला ९० च्या दशकातील सुपरहिट आणि सुंदर अभिनेत्रींमधील एक मानले जाते.

# पलक तिवारीची सलमान खानच्या बिग बजेट चित्रपटात एन्ट्री

बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या आगामी ‘कभी ईद कभी दिवाली’ ज्याचे टायटल आता ‘भाईजान’ करण्यात आले आहे. हा चित्रपट आता अनेक कारणांमुळे सध्या चर्चेत आहे. यात स्टारकास्टमुळेही या चित्रपटाची विशेष चर्चा आहे. ‘बिग बॉस 13’ मधून प्रचंड लोकप्रिय झालेली शहनाज गिलला निर्मात्यांनी या चित्रपटात कास्ट केले आहे. यात आता सोशल मीडिया स्टार पलक तिवारीची (श्वेता तिवारीची मुलगी) चित्रपटातील स्टारकास्टमध्ये एन्ट्री झाल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या चित्रपटासाठी पलकची निवड स्वत: सलमान खानने केली आहे. पलक या चित्रपटात जस्सी गिलच्या ऑपोजिट दिसणार असून दोघांचाही एक उत्तम ट्रॅक असणार आहे. पलकने नुकतेच शूटिंगला सुरुवात केली आहे. मात्र पलक याविषयी अद्याप काहीही माहिती दिली नाही. फरहाद सामजी या चित्रपटात व्यंकटेश, पूजा हेगडे, राघव जुयाल, सिद्धार्थ निगम आदींसह अनेक कलाकार झळकणार आहे. दरम्यान पलकच्या एन्ट्रीमुळे आता प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. पलकने आत्तापर्यंत अनेक म्युझिक व्हिडिओंमध्ये तिच्या स्टाइलने आणि नृत्य कौशल्याने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता या मल्टिस्टारर चित्रपटातही चाहत्यांना त्याचे अभिनय कौशल्य पाहायला मिळणार आहे.

पलकने यापूर्वी सलमान खान आणि आयुष शर्माच्या ‘अंतिम: द फायनल ट्रुथ’ या चित्रपटात सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले आहे. तसेच ती ‘बिग बॉस 15’ मध्ये सलमान खानसोबत स्टेज शेअर करताना दिसली होती.



# ‘वाय’ चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

नेक चित्रपटगृहांमध्ये दिसणाऱ्या स्टँडीज मुळेही 'वाय' या चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे. सुरुवातीला फक्त मुक्ता बर्वेचाच चेहरा समोर आल्यानंतर पडद्याआड असलेले चित्रपटातील इतर कलाकारही आता समोर आले आहेत अजित सूर्यकांत वाडीकर लिखित व दिग्दर्शित ‘वाय’ हा सिनेमा येत्या २४ जून रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट सत्य घटनांवर आधारित असून, मराठीत पहिल्यांदाच असा हायपरलिंक थरार प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. पहिल्या पोस्टरपासूनच खरतर या चित्रपटाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. अनेक चित्रपटगृहांमध्ये दिसणाऱ्या स्टँडीज मुळेही ‘वाय’ या चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे. सुरुवातीला फक्त मुक्ता बर्वेचाच चेहरा समोर आल्यानंतर पडद्याआड असलेले चित्रपटातील इतर कलाकारही आता समोर आले आहेत.




काही दिवसांपूर्वी ‘वाय’ या चित्रपटाचे एक टिझर झळकले होते. त्यात चित्रपटातील सर्व अभिनेत्रींचे दर्शन घडले होते.एकाच वेळी वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या आयुष्यात घडणाऱ्या घडमोडींची एक धावती झलक यात दिसली होती. यात मुक्ता बर्वे व्यतिरिक्त प्राजक्ता माळी, रसिका चव्हाण प्रमुख भूमिकेत असल्याचे दिसून आले होते.

## शॉर्ट न्यूज »

### T20 मध्ये पहिल्यांदाच 7 फलंदाजांनी मारले 3 हून अधिक षटकार



। नवी दिल्ली । महाईन्यूज

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या T20 सामन्यात टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विक्रमी धावांचा पाठलाग करत भारताचा पराभव केला. टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपली सर्वात मोठी धावसंख्या (211 धावा) केली, परंतु दक्षिण आफ्रिकेने टी 20 मधील त्यांच्या सर्वात मोठ्या धावसंख्येचा (212 धावा) पाठलाग करून विजय मिळवला.

या सामन्यात अनेक विक्रम झाले. दोन्ही संघांच्या एकूण सात विकेट पडल्या. भारताने चार विकेट गमावल्या होत्या आणि दक्षिण आफ्रिकेनेही तीन विकेट गमावल्या होत्या. या सामन्यात खूप धावा झाल्या आणि दोन्ही संघांनी मिळून एकूण 423 धावा केल्या. या सामन्यात तीन किंवा त्याहून अधिक षटकार ठोकणारे सात फलंदाज होते.

# शोएब अख्तरला मास्टर ब्लास्टरने बनवलं स्टार

## 23 वर्षांनंतर पाकच्या गोलंदाजाचा मोठा खुलासा

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।



पाकिस्तानचा माजी गोलंदाज शोएब अख्तर हा पाकिस्तानच्या सर्वोत्तम वेगवान गोलंदाजांपैकी एक आहे. खेळाच्या दिवसांमध्ये शोएब मैदानावर वेगवान गोलंदाजीमुळे नेहमीच चर्चेत असायचा. तसेच निवृत्तीनंतरही तो आपल्या वक्तव्यांमुळे चर्चेत राहतो. मात्र, यावेळी शोएब अख्तरने भारताचा महान खेळाडू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरबाबत मोठा खुलासा केला आहे.

शोएब अख्तर म्हणाला की, अल्लाहनंतर सचिनच आहे, ज्याने मला स्टार बनवले.

### संपूर्ण मैदानात पसरली शांतता – शोएब अख्तर

जेव्हा मी सचिनला आऊट केले त्यानंतर संपूर्ण मैदानात शांतता पसरली होती. तिथे फक्त माझा आवाज येत होता. सचिनला बाद केल्यानंतर मी एक गोष्ट बोललो होतो की, मला अल्लाहनंतर कोणी स्टार म्हटले आहे तर तो तूच आहेस. एवढेच नाही तर सचिनने असे का विचारले, तेव्हा मी त्याला उत्तर दिले की, जर मी तुम्हाला आऊट केलं नसतं तर माझं मन विचलीत झालं असतं. हे म्हटल्यानंतर सचिन म्हणाला की, तुम्ही हे सर्व डिझर्व्ह करता.

### शोएब अख्तरची कारकीर्द काय?

शोएब अख्तरने ४६ कसोटी, १६३ एकदिवसीय आणि १५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भाग घेतला आहे. कसोटी सामन्यांमध्ये, अख्तरने २५.६९ च्या सरासरीने १७८ इतकी गडी बाद केले आहेत. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अख्तरच्या नावावर २४.९७ च्या सरासरीने २४७ विकेट्स आहेत. टी-२० सामन्यांबद्दल बोलायचे झाले तर २२.७३ च्या सरासरीने शोएब अख्तरने १९ विकेट्स घेतले आहेत.

### सचिनने मला स्टार बनवले – शोएब अख्तर

शोएब अख्तरने एका स्पोर्ट्स वेबसाईटसोबत संवाद साधला होता. त्यावेळी अख्तर म्हणाला की, मी सकलेन मुश्ताकला विचारले होते की, क्रिकेटचा देव कोणाला म्हटलं जातं. तेव्हा मुश्ताकने मला सचिनचं नाव सांगितलं. तेव्हा मी त्यांना सांगितलं की, जर मी सचिनला आऊट केलं तर काय होईल?, त्यानंतर मुश्ताक म्हणाला की, त्याने मागील दोन कसोटी सामन्यांत सचिनला आऊट केलं आहे. अशातच मुश्ताक आणि माझ्यामध्ये एका मैत्रीपूर्ण लढाईला सुरूवात झाली. सचिनला आऊट केल्यानंतर मला रातोरात प्रसिद्धी मिळाली होती. त्यामुळे अल्लाहनंतर मला कोणी स्टार बनवलं असेल तर तो सचिन तेंडुलकरच आहे, असं अख्तर म्हणाला.

# पीव्ही सिंधू आणि लक्ष्य सेनची उपांत्यपूर्व फेरीत धडक

## रेड्डी-पोनप्पा इंडोनेशिया मास्टर्स स्पर्धेतून बाहेर



। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारताची दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता पीव्ही सिंधू आणि जागतिक चॅम्पियनशिप कांस्यपदक विजेता लक्ष्य सेनना जिंकून इंडोनेशिया मास्टर्स सुपर 500 बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. बँकॉकमधील थॉमस चषक स्पर्धेत ऐतिहासिक विजेतेपदाच्या वेळी भारतीय संघाचा भाग असलेल्या अल्मोराच्या 20 वर्षीय लक्ष्यने जागतिक क्रमवारीत 13व्या स्थानावर असलेल्या डेन्मार्कच्या रासमुस गेमकेचा 54 मिनिटांत 21-18, 21-15 अशा फरकाने पराभव केला. तर सिंधूला महिला एकेरीत थोडा संघर्ष करावा लागला. एका तासाच्या दुसऱ्या फेरीच्या लढतीत इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मारिस्का तुनजांगचा 23-21,20-22,21-11 असा पराभव केला.

पिव्ही सिंधू समोर उपांत्यपूर्व फेरीत कडवे आव्हान असेल. चौथ्या मानांकित भारतीयाचा सामना पाचव्या मानांकित थायलंडच्या रत्चानोक इंतानोन आणि स्कॉटलंडच्या क्रिस्टी गिलमोर यांच्यातील विजेत्याशी होणार आहे. तर बी सुमीथ रेड्डी आणि अश्विनी पोनप्पा यांचा प्रवास मिश्र दुहेरीत 18-21, 13-21 असा पराभूत झाल्याने झेंग सी वेई आणि चीनच्या हुआंग या कियांग दुसऱ्या मानांकित चीनच्या जोडीकडून दुसऱ्या फेरीच्या लढतीत पराभव झाला.

बिगरमानांकित तुनजुंगविरुद्ध, सिंधूने चांगली सुरुवात केली आणि आक्रमक खेळ करत 10-5 अशी आघाडी घेतली. सुरुवातीला त्यांनी दिर्घकालीन खेळीचा चांगला वापर केला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही